# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO 9001:2008)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, चौथा मजला, 49, खेरवाडी, अलीयावर जंग मार्ग,
बांद्रा (पूर्व), मुंबई – 400 051.

दूक्र. – 264721255(का)/26470916(वै) फॅक्स 022–26477217

Email : director@msbte.com Web : www.msbte.com

**परिपत्रक** जा.क्र.मरातंशिमं/का-५९/सीडीसी/२०१०-११/**२४९**

दिनांक- **१४ जानेवारी, २०११**

तत्रशिक्षण मंडळाने शासकीय/अनुदानित/विना अनुदानित तंत्रनिकेतनांमधील प्राध्याकांना तांत्रिक पेपर लिहीणे व वाचन करणे, तांत्रिक कार्यशाळा, चर्चा सत्रे व परिषदा यांत सक्रीय भाग घेणे, विषयातील अद्ययावत ज्ञान मिळविणे इ. बाबत प्रोत्साहीत करण्याकरीता मंडळ प्राधान्य देत असते.

प्राध्यापकांनी संबंधीत कार्यशाळा, चर्चासत्रे, परिषदा ह्यामध्ये भाग घेतला तर त्यांचा स्वतःचा विकास तर होतोच, त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे पर्यायाने विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास होण्यासाठी अधिक लाभ होत असतो. असे आढळून आले आहे की, अनेक प्राध्यापक निधी अभावी, स्वारस्य असूनही अशा प्रकारच्या उपक्रमामध्ये भाग घेऊ शकत नाहीत. या पार्श्वभूमीवर मंडळामार्फत खालील अटींच्या अधिन राहून अर्थ साहाय्य करण्यात येईल.

१) प्रत्येक प्राध्यापकास एका शैक्षणिक वर्षामध्ये एकदाच अर्थसाहाय्य करण्यात येईल.
२) उपरोक्त बाबतीत/पेपर वाचनासाठी निवड झाल्यानंतर मंडळाच्या पूर्वपरवानगीकरीता अर्ज (with Abstract) संस्था प्राचार्यांच्या शिफारशीसह मंडळास सादर करावेत.
३) एकच पेपर एकापेक्षा जास्त प्राध्यापकांनी एकत्रित वाचनासाठी निवड केल्यास केवळ एकाच प्राध्यापकास अर्थ साहाय्य करण्यात येईल. (प्रथम नाव असलेल्या प्राध्यापकास)
४) मंडळाकडून पेपर वाचनाकरीता केवळ रजिस्ट्रेशन शुल्क व जाण्यायेण्याचा A.C. III Tier रेल्वे भाडेखर्च मंजूर करण्यात येईल. प्रसंगानुरुप बस/रिक्षा यांचा कमितकमी अंतरावरचा खर्च देण्यात येईल.
५) प्रत्येक प्राध्यापकास एका शैक्षणिक वर्षामध्ये देशांतर्गत व देशाबाहेर पेपर वाचनाकरीता एका वेळेस प्रत्यक्ष वर नमुद केलेला (क.४) खर्च अथवा कमाल रु. ५,०००/- (रुपये पाच हजार फक्त) अर्थ साहाय्य मंजूर करण्यात येईल.
६) याकरीता वास्तव्याचा, जेवणाचा, दैनंदिन भत्ता व इतर कोणताही खर्च ग्राह्य धरण्यात येणार नाही. त्यामुळे सदर खर्चाचा देयकामध्ये उल्लेख करु नये.
७) पेपर वाचनानंतर मंडळाकडून प्राप्त झालेल्या नमुना देयकामध्ये सविस्तर माहिती भरुन मुळ कागदपत्रे, रेल्वे/बस टिकीटासह देयक प्रतिपूर्तीसाठी मंडळाकडे सादर करावे.
८) आपण सादर केलेल्या देयकाचे प्रतिपूर्तीचा धनादेश संबंधितांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठविण्यात येईल.

सर्व प्राध्यापकांनी मंडळाकडून मिळणा-या आर्थिक साहाय्याचा या परिपत्रकानुसार शैक्षणिक विकासासाठी अधिकाधिक लाभ घ्यावा.

(जी.बी. धनोकार)
संचालक
म.रा.तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई.

प्रत :

१) सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांना माहितीकरीता

२) सर्व कार्यसन अधिकारी, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांना पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी.

३) उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय पुणे/नागपूर/औरंगाबाद व प्रभारी अधिकारी, मुंबई उपविभाग यांनी त्यांच्या विभागातील सर्व संस्थांना वरीलप्रमाणे कळवावे.

४) सर्व प्राचार्य, शासकीय/अनुदानित/विना अनुदानित तंत्रनिकेतने यांना माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीकरीता.

५) पोर्टल मॅनेजर, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांना आवश्यक कार्यवाहीकरीता.

६) स्थळ प्रत.